सं.फौ.ख.क्र.२६५/२०२५

शासन वि. राजकुमार

नि.क्र.१२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

नावः ललीत चांगदेव जुमनाके,

वयः ४० वर्ष, धंदाः जवान,

पत्ताः रा.उ.शु. ड विभाग पारशिवणी, जि. नागपूर,

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी दि. १९/१०/२०२४ रोजी रा.उ.शु. ड विभाग पारशिवनी येथे जवान पदावर कार्यरत होतो. त्या रोजी खबर मिळाली की आरोपी राजकुमार रामराव गजभिये हा त्याच्या राहत्या घरी तामसवाडी येथे अवैध्यरित्या देशी दारु विक्री करीत आहे. त्यावरुन एस. एच. राजगडे, व पंचासह आरोपी घरी गेलो. आरोपीच्या घराची झडती घेतली असता १३ देशी दारुच्या १८० मि.ली क्षमतेच्या दारूने भरलेल्या शिश्या मिळून आल्या. दोन बॉटल रासायनिक परिक्षनासाठी वेगळया काढल्या. घटनेची फिर्याद मी नोंदविली. आता मला फिर्याद दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **नि. क्र. १३** देण्यात येते. नमूना रासायनिक परिक्षणाकरिता घेऊन गेलो. आता मला रासायनिक परिक्षणाकरिताची प्रत दाखविली. त्यावर पत्र मिळाल्याबाबत प्रयागेशाळेतील लिपिकाची सही आहे. त्यास **नि. क्र.१४** देण्यात येते. मी आरोपीस ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्री. व्ही. टी चौधरी वकील मॅडम यांचेमार्फत उलटतपास सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/१०/२०२४ रोजी मी कर्तव्यावर होतो याबाबत हजेरीपटाचा दस्त अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा घराचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तामसवाडी येथे गेलो

नाही.   हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरुन कोणतीही दारु जप्ती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, रासायनीक परिक्षणाकरिता वेगळी काढली नाही व ती रासायनिक परिक्षणाकरिता घेऊन गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की दुस–या गुन्हाच्या मुद्देमालाची रासायनिक परिक्षण करिता नमुना प्राप्त झाल्या बाबत हया गुन्हात दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्वीकृत,** | **समक्ष** |
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Date: 2026.03.16 11:08:44 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Date: 2026.03.16 11:08:47 +0530 |
| (**जी.ओ. वानखडे**) | (**जी.ओ. वानखडे**) |
| न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी | न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी |

दिनांकः  १२/०३/२०२६